

पेठनाका (ता. वाळवा) येथील नानासाहेब महाडिक शैक्षणिक संकुलातील पूरबाधित विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्राचार्य महेश जोशी यांच्याहस्ते मदतीचे वाटप करण्यात आले.

# महाडिक शिक्षण संकुलाची पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत

## घरी जाऊन वाटप : जीवनावश्यक वस्तू दिल्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**इस्लामपूर** : महाडिक कुटुंबीयांचा समाजसेवेचा आदर्श समोर ठेवून नानासाहेब महाडिक शिक्षण संकुलाच्यावतीने महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यात आला.

महाडिक शिक्षण संकुलामध्ये जे विद्यार्थी शिक्षण घेतात आणि जे पूरबाधित आहेत, त्यांच्या घरी भेट देऊन त्यांना जीवनावश्यक वस्तू देण्यात आल्या. बऱ्याच विद्यार्थ्यांच्या घरामध्ये पाणी शिरले असल्यामुळे पाणी पातळी कमी झाल्यावर घर स्वच्छतेसाठीही मदत करण्यात येणार आहे. जवळपास १०० पेक्षा जास्त विद्यार्थी पूरपीडित असून त्यांना आवश्यक ती मदत करण्यात येत आहे. पूरग्रस्त विद्यार्थी व त्यांचे पालकांच्या डोळ्यातील आपलेपणाचा भाव खूप काही सांगून जात आहे.

यावेळी प्राचार्य महेश जोशी, विभागप्रमुख प्रा. विनोद कापसे, उपप्राचार्य प्रा. सी. बी. पाटील, प्रा. शीतल गावडे, प्रा. किशोर शिंदे, प्रा. विकास पाटील, प्रा. सुनील जांभळे हे परिश्रम घेत आहेत.